ePaper
अमेरिकेत स्ट्रीट फेस्टिव्हलमध्ये थरार! अंदाधुंद गोळीबारात 12 जण जखमी

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | सोमवार, दि. 08 जून 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!




पान 2 वरुन...

पाणीपट्टीचा वाद मुख्यमंत्री 'वॉर रूम' मध्ये!

## छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा उभारणार; इस्त्रायली वाणिज्य दूतांची घोषणा

# इस्त्रायलमध्ये घुमणार शिवरायांचा जयघोष!



**महाईन्यूज ।**
**मुंबई**

**शिवराज्यभिषेक दिलाच्या सुवर्णमुहूर्तावर भारत आणि इस्त्रायलमधील संबंध अधिक दृढ करणारी एक अत्यंत महत्त्वाची आणि ऐतिहासिक घोषणा करण्यात आली आहे. इस्त्रायलचे मुंबईतील वाणिज्यदूत यानिव रेवाच यांनी इस्त्रायलमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य पुतळा उभारण्याची इच्छा व्यक्त केली आहे.**

यासाठी त्यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन चर्चा केली आणि या ऐतिहासिक प्रकल्पासाठी राज्य सरकार सहकार्य व परवानगी मागितली आहे. देवेंद्र फडणवीस यांनीही या उपक्रमाचे स्वागत करत राज्य सरकारकडून पूर्ण पाठिंबा देण्याचे आश्वासन दिले आहे.

यानिव रेवाच यांनी सांगितले की, काही महिन्यांपूर्वी भारतात आल्यानंतर त्यांनी दोन्ही देशांच्या इतिहासाचा आणि संस्कृतीचा अभ्यास केला. भारत आणि इस्त्रायल या दोन्ही राष्ट्रांचा इतिहास संघर्षाचा राहिला आहे. जसा मराठ्यांनी आपल्या भूमीसाठी आणि स्वराज्यासाठी मोठा संघर्ष केला, तसाच ज्यू बांधवांनाही आपल्या मातृभूमीसाठी अनेक दशके लढा द्यावा लागला आहे.

रेवाच यांच्या मते, छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य, रणनीती आणि त्यांचे विचार केवळ भारतासाठीच नव्हे, तर संपूर्ण जगासाठी प्रेरणादायी आहेत. त्यामुळेच इस्त्रायलमधील जनतेला भारताच्या या महान राजाबद्दल माहिती व्हावी आणि दोन्ही देशांमधील सांस्कृतिक संबंध अधिक घट्ट व्हावे, यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.



## राज्य सरकारचा पूर्ण पाठिंबा

या संदर्भात यानिव रेवाच यांनी देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली असता, फडणवीस यांनी तत्काळ या प्रस्तावाला मंजुरी दिली आणि आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. या ऐतिहासिक निर्णयामुळे जागतिक स्तरावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा प्रसार होणार असून, भारत-इस्त्रायल मैत्रीत एक नवा सुवर्णअध्याय लिहिला जाणार आहे.

## काय आहे योजना?

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जेरुसलेम दौऱ्यांनंतर भारत आणि इस्त्रायलमधील द्विपक्षीय संबंधांना एक नवी दिशा मिळाली आहे. केवळ व्यापारी किंवा राजकीय पातळीवरच नव्हे, तर दोन्ही देशांतील नागरिकांमध्ये भावनिक नाते निर्माण व्हावे हा या पुतळ्यामागचा मुख्य उद्देश आहे. भारतात छत्रपती शिवाजी महाराजांचा एक भव्य पुतळा तयार केला जाईल. हा पुतळा इस्त्रायलमधील एका प्रमुख आणि मोठ्या शहरात सन्मानाने प्रस्थापित करण्यात येईल. या प्रकल्पामुळे इस्त्रायल आणि भारतातील नागरिक दीर्घकाळासाठी एकमेकांशी जोडले जातील.

# पाणीपट्टीचा वाद मुख्यमंत्री 'वॉर रूम' मध्ये!

## जलसंपदा विभागाच्या १२०० कोटींच्या दाव्यावर महापालिकेची हरकत

**महाईन्यूज । पुणे**

**पुणे महापालिकेकडून आकारण्यात येणाऱ्या पाणीपट्टी आणि अतिरिक्त पाणी वापर शुल्कावरून सुरू असलेला महापालिका व जलसंपदा विभागातील वाद आता थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दरबारी पोहोचला आहे. जलसंपदा विभागाकडून औद्योगिक वापराच्या दराने आकारण्यात येणाऱ्या शुल्काला महापालिकेने पुन्हा एकदा विरोध दर्शवत मुख्यमंत्री आणि त्यांच्या कार्यालयाकडे तक्रार नोंदविल्याची माहिती समोर आली आहे. मुख्यमंत्र्यांच्या 'वॉर रूम'मध्ये विविध प्रकल्पांच्या आढावा बैठकीदरम्यान महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी हा मुद्दा उपस्थित केल्याचे समजते.**




पुणे शहराला खडकवासला धरण साखळीतून तसेच भामा आसखेड धरणातून पाणीपुरवठा केला जातो. गेल्या काही वर्षांमध्ये शहराची लोकसंख्या वाढली आहे. मात्र त्यातुलनेत दिल्या जाणाऱ्या पाण्याच्या कोट्यात मात्र कोणतीही वाढ झाली नाही. महापालिका शहरासाठी मंजूर पाणी कोट्यापेक्षा अधिक पाणी उचलले जात असल्याचा दावा जलसंपदा विभागाकडून केला जातो. त्यावरून अतिरिक्त शुल्क आकारण्यात येते.

शहरात औद्योगिक वापरासाठी पाण्याचा वापर नगण्य असतानाही औद्योगिक दराने जलसंपदा विभाग आकारणी करत असल्याचे महापालिका प्रशासनाचे म्हणणे आहे. जलसंपदा विभागाच्या या पद्धतीमुळेच दरवर्षी ज्यादा पाण्याच्या वापराबाबत कोट्यवधी रुपयांची देयके महापालिकेला पाठवली जातात. तथापि, औद्योगिक वापरच होत नसल्याने ही बिले भरण्यास महापालिकेकडून नकार दिला जात आहे.

पाणी आरक्षण वाढविण्याची आणि प्रत्यक्ष वापराशी सुसंगत आकारणी करण्याची महापालिकेची मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. जलसंपदा विभागाकडून वाढीव कोटा मंजूर न करता वाढीव शुल्क आकारले जात असल्याने आर्थिक ताण वाढत असल्याची भूमिका पालिकेने घेतली आहे. त्यामुळे औद्योगिक दराने आकारण्यात येणाऱ्या शुल्कात सवलत देऊन या प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढावा, अशी मागणी महापालिकेने मुख्यमंत्री कार्यालयाकडे केली आहे.

पाणी ही जीवनावश्यक गरज असताना त्यावरील आकारणीचा बोजा स्थानिक स्वराज्य संस्थांवर पडू नये, अशी भूमिका मांडत महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी मुख्यमंत्री कार्यालयाकडे तक्रार केली आहे. या प्रकरणात शासन स्तरावर सकारात्मक निर्णय होऊन लवकरच तोडगा निघेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.

महापालिका आयुक्त नवल किशोर राम म्हणाले, महापालिका आणि जलसंपदा विभाग यांच्यामध्ये अनेक विषय प्रलंबित आहे. या प्रलंबित प्रश्नावर तोडगा निघावा यासाठी महापालिका प्रयत्नशील आहे. मात्र संपदा विभागाकडून सहकार्य नाही. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व त्यांचे अप्पर मुख्य सचिव लोकेश चंद्रा यांच्याकडे तक्रार केली आहे. त्यावर लवकर तोडगा निघेल, अशी अपेक्षा आहे.

दरम्यान, शहराची वाढती पाणी गरज, विस्तारित हद्द आणि जलसंपदा विभागाच्या आकारणीतील विसंगती यामुळे पाणीपट्टीचा हा वाद आगामी काळात अधिकच वाढण्याची शक्यता आहे.

### थकबाकी १२०० कोटींवर

पुणे महापालिका आणि जलसंपदा विभागातील हा वाद २०१६ पासून सुरू असून त्यावरील दावा आणि दंडाची रक्कम आता सुमारे १२०० कोटी रुपयांहून अधिक झाली आहे. या प्रकरणाची सुनावणी सध्या लवादापुढे सुरू आहे. दरम्यान, महापालिका हद्दीत ३२ गावांचा समावेश झाल्याने शहराची लोकसंख्या आणि पाण्याची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. शहराची वाढलेली हद्द आणि भविष्यातील गरजा लक्षात घेता शहराला किमान २१ टीएमसी पाण्याची आवश्यकता आहे. तसेच नियमानुसार महापालिकेला हद्दीबाहेरील पाच किलोमीटर परिसरालाही पाणीपुरवठा करावा लागत आहे. मात्र, प्रत्यक्ष गरज आणि मंजूर पाणी आरक्षण यामध्ये मोठी तफावत असल्याचा दावा पालिकेने केला आहे.

# रिसॉर्टवर धाड, आयटीतील ६० ते ७० तरुण-तरुणी झिंगलेल्या अवस्थेत!

**महाईन्यूज । पुणे**

**पुणे शहराजवळील एका रिसॉर्टवर छापा टाकून पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. आळंदी-मरकळ रस्त्यावरील रिसॉर्टमध्ये सुरू असलेल्या पार्टीवर पुणे पोलिसांनी धाड टाकली असून झिंगलेल्या तरुणी-तरुणींसह अनेक जणांना ताब्यात घेण्यात आलं आहे. तसंच यावेळी पोलिसांकडून नशेसाठी वापरले जाणारे पदार्थही जप्त करण्यात आले आहेत.**



मिळालेल्या माहितीनुसार, पुणे शहराजवळ असणाऱ्या आळंदी- मरकळ रस्त्यावरील एका रिसॉर्टमध्ये तरुण-तरुणींची पार्टी सुरू होती होती. या पार्टीमध्ये अमली पदार्थ वापरले जात असल्याची माहिती पुणे पोलिसांना मिळाली. त्यानंतर पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या पथकाने सदर रिसॉर्टवर धाड टाकली. लोणीकंद पोलिस ठाण्याच्या हद्दीत हे रिसॉर्ट असून या पार्टीत ६० ते ७० तरुण-तरुणी होत्या, असे समजते. तुळापूर परिसरातील या रिसॉर्टवर सुरू असलेल्या या पार्टीला प्रोजेट एक्स असं नाव देण्यात आलं होतं. विना परवाना दारू आणि साउंडचा वापर होत असलेल्या या पार्टीत झिंगलेले तरुण तरुणी आढळून आले. मध्यरात्रीपर्यंत हा धांगड धिंगाणा सुरू होता.

या पार्टीत अमली पदार्थांचा वापर झाल्याचा संशय पोलिसांना आहे. त्या दृष्टीने देखील आता तपास सुरू आहे. मध्यरात्री गुन्हे शाखेचा भला मोठा फौजफाटा या परिसरामध्ये घुसला आणि त्यांनी या पार्टीवर कारवाई केली. या पार्टीमध्ये सर्व उच्चशिक्षित आयटीआय क्षेत्रात काम करणारे तरुण-तरुणी सहभागी होते. पोलिसांनी शहरातील हॉटेल वरती नियमांचा बडगा उगारण्यास सुरुवात केल्यानंतर आता अशा पार्ट्या उपनगराच्या आणि पुणे ग्रामीण परिसराला लागून असणाऱ्या गावांमध्ये होत असल्याचा प्रकार या पार्टीच्या निमित्ताने समोर आला आहे.

### आयटी, उच्चशिक्षित तरुण-तरुणींचा भरणा

या पार्टीत सहभागी झालेल्यांमध्ये आयटी आणि इतर क्षेत्रांतील उच्चशिक्षित तरुण-तरुणींचा मोठा सहभाग असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. शहरातील हॉटेल्स आणि पब्सवरील नियमांची कडक अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर, अशा प्रकारच्या पार्ट्या शहरालगतच्या ग्रामीण भागातील रिसॉर्ट्समध्ये आयोजित केल्या जात असल्याचे या कारवाईतून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

# अनधिकृत बांधकामांवर पालिकेचा ‘नवा फंडा’

## अनधिकृत बांधकामांवर नोटीस फ्लेक्स लावण्याची कारवाई

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**शहरात अनधिकृत बांधकामे जोमात सुरू असून, महापालिका प्रशासनाच्या आदेशाला न जुमानता तीनपासून सहा मजल्यापर्यंत इमारती दाटीवाटीने उभ्या राहत आहेत. यावरून शहरात अनधिकृत बांधकामांचे पेव फुटल्याचे स्पष्ट होत आहे. त्यासंदर्भात मोठ्या प्रमाणात तक्रारी येत असल्याने सदर अनधिकृत इमारतींच्या बांधकामावर महापालिकेने नोटिशीचे फ्लेक्स बोर्ड लावण्याचा नवा फंडा राबवला आहे.**




महापालिकेच्या ‘फ’ क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात निगडी येथील रुपीनगर मेन रोड, तळवडे येथील गजानन हौसिंग सोसायटी परिसरात सुरू असलेल्या चार आरसीसी स्वरूपातील बांधकामांवर बांधकाम अनधिकृत असल्याबाबतचे नोटीस बोर्ड लावण्यात आले असल्याची माहिती क्षेत्रीय अधिकारी अतुल पाटील यांनी दिली आहे.

ही बांधकामे महापालिकेच्या बांधकाम नियमावली व विकास नियंत्रण नियमांचे उल्लंघन करून रेड झोन मध्ये उभारली जात असल्याचे निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित बांधकाम धारकांना नोटीस बजावण्यात आली असून, या बांधकामांवर लवकरच निष्कासनाची कार्यवाही प्रस्तावित असून, नियमानुसार आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून संबंधित बांधकामे निष्कासित करण्यात येणार आहेत.

> महापालिकेने अनधिकृत बांधकामांविरोधात कठोर भूमिका घेतली आहे. विकास नियंत्रण नियम व सक्षम प्राधिकरणाची मंजुरी नसलेली कोणतीही बांधकामे खपवून घेतली जाणार नाहीत. अशा बांधकामांना नियमानुसार नोटिसा बजावण्यात आल्या असून, टप्प्याटप्प्याने निष्कासन कारवाई केली जाईल. नागरिकांनी मालमत्ता खरेदीपूर्वी सर्व आवश्यक परवानग्या व कागदपत्रांची पडताळणी करूनच व्यवहार करावा.
> **- डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, महापालिका.**

दरम्यान, अनधिकृत बांधकामांवर भविष्यातही नियमानुसार सातत्याने कारवाई करण्यात येणार असून शहरातील नियोजित व सुरक्षित नागरी विकासासाठी नियमभंग करणाऱ्या बांधकामांना कोणतीही सवलत दिली जाणार नाही, असे महापालिकेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

लोकसभा, विधानसभा व महापालिका निवडणूक आचारसंहिता, जनगणना, मतदार यादीचे काम तसेच, पावसाळा आदी काळात अनधिकृत बांधकामांवर कारवाई केली जात नाही. तसेच, लोकप्रतिनिधींकडून होणारा राजकीय हस्तक्षेप, बीट निरीक्षकांसोबतच अर्थपूर्ण संबंध आदी कारणांमुळे कारवाईस टाळाटाळ केली जाते. केवळ नोटिसा बजावून क्षेत्रीय कार्यालयांकडून वेळकाढूपणा केली जातो. तक्रारी प्राप्त होऊनही ठोस आणि नियमितपणे कारवाई होत नसल्याने संपूर्ण शहरात अनधिकृत बांधकामे जोमात सुरू असल्याचा आरोप केला जात आहे.

### पालिकेचे आवाहन

महापालिकेच्या वतीने नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणतीही स्थावर मालमत्ता, फ्लॅट किंवा घर खरेदी करण्यापूर्वी संबंधित बांधकामास सक्षम प्राधिकरणाची मंजुरी, बांधकाम परवानगी व इतर आवश्यक कागदपत्रांची काटेकोरपणे पडताळणी करावी. अनधिकृत बांधकामांमध्ये गुंतवणूक केल्यास आर्थिक नुकसान होण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी योग्य ती दक्षता घ्यावी.

# पर्यावरण मंत्रालयाने जाहीर केलेल्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर थेट कायदेशीर कारवाई

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**केंद्र शासनाने अधिसूचित केलेल्या ‘घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६’ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेने कंबर कसली आहे. या अनुषंगाने महापालिकेच्या आरोग्य विभागातर्फे शुक्रवारी (दि.५) ग. दि. माडगूळकर नाट्यगृहात विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.**




महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यशाळेत नवीन नियमांची माहिती देत, शहर विद्रूप करणाऱ्यांवर थेट गुन्हे दाखल करण्याचे कडक निर्देश आयुक्तांनी प्रशासनाला दिले. पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने जाहीर केलेल्या या नियमांची अंमलबजावणी १ एप्रिलपासून सुरू झाली आहे. तसेच, सर्वोच्च न्यायालयानेही या नियमांचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश दिले आहेत. याच पार्श्वभूमीवर महापालिकेच्या सर्व संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना नव्या नियमांची माहिती देण्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यशाळेत मार्गदर्शन करताना आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी म्हणाले की, स्वच्छ, हरित आणि शाश्वत शहर उभारण्यासाठी प्लास्टिकचा वापर कमी करणे आणि कचऱ्याचे स्रोतस्तरावर (उगमस्थानी) वर्गीकरण करणे ही काळाची गरज आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार मोठ्या आस्थापनांना नियमांच्या पालनासाठी आवश्यक ते मार्गदर्शन केले जाईल. प्रत्येक नागरिकाने शहराला स्वतःचे घर समजून स्वच्छतेसाठी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

शहरातील गृहनिर्माण संस्थांमध्ये कचरा व्यवस्थापनाबाबत जनजागृती करण्यासाठी यापुढे विशेष कार्यशाळा घेतल्या जातील. लोकसहभागातूनच सुंदर शहर घडू शकते, असा विश्वास व्यक्त करत त्यांनी फूटपाथ, रस्ते आणि अतिक्रमणांवरील कारवाई यापुढेही तीव्र राहणार असल्याचे स्पष्ट केले. भविष्यात पिंपरी-चिंचवड शहर देशात स्वच्छतेत अग्रस्थानी असेल, असा विश्वास त्यांनी वर्तवला.

या कार्यशाळेस मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, सह शहर अभियंता मनोज सेठिया, मुख्य उद्यान अधीक्षक महेश गारगोटे, उपआयुक्त अण्णा बोदडे यांच्यासह क्षेत्रीय अधिकारी, कार्यकारी अभियंता, आरोग्य निरीक्षक आणि आरोग्य विभागातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.

### गुणवंत कर्मचाऱ्यांचा सन्मान

याच कार्यक्रमात आयुक्तांच्या हस्ते ‘माझी वसुंधरा ५.०’ अभियानात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या उद्यान, पर्यावरण आणि आरोग्य विभागातील गुणवंत कर्मचाऱ्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांनी सांगितले की, नवीन नियमांमुळे घनकचरा व्यवस्थापन अधिक शिस्तबद्ध आणि उत्तरदायी होणार आहे. यासाठी विभागीय समन्वय, नियमित निरीक्षण आणि नागरिकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा ठरेल.

# मविआची हवा ओसरली, शिंदेंचा प्रभाव वाढला



## भूमिका

**राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांच्या विधान परिषद निवडणुकीने महाराष्ट्रातील बदलते राजकीय वास्तव अधोरेखित केले आहे. महाविकास आघाडीतील विसंवाद, उमेदवारीतील गोंधळ आणि परस्पर अविश्वास उघड झाल्याने महायुतीने मानसिक आघाडी घेतल्याचे स्पष्ट दिसते.**



१७ पैकी पाच उमेदवार बिनविरोध होणे हा विरोधकांसाठी मोठा धक्का मानला जात आहे. विशेषतः राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाशी जवळीक असलेली मंडळी महायुतीच्या तिकिटावर बिनविरोध निवडून आल्याने विरोधी आघाडीची पकड सैल झाल्याची चर्चा अधिक तीव्र झाली आहे.

पुण्यासारख्या महत्त्वाच्या मतदारसंघात काँग्रेसला पुरेशी संधी न मिळणे, ठाकरे सेनेच्या उमेदवारांनीच अपेक्षाभंग करणे आणि अनेक ठिकाणी राष्ट्रवादीच्या भूमिकेमुळे काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये नाराजी निर्माण होणे, हे महाविकास आघाडीतील समन्वयाच्या अभावाचे संकेत ठरले. नाशिक आणि सोलापूरमध्ये अर्ज माघारीच्या राजकारणामुळे निर्माण झालेले नाट्यही विरोधकांची अस्वस्थता दाखवणारे ठरले.

या सर्व घडामोडींमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे राजकीय चातुर्य पुन्हा अधोरेखित झाले असले तरी राज्यातील सध्याचे वातावरण केवळ विरोधक विरुद्ध सत्ताधारी असे राहिलेले नाही. उलट, महायुतीतच देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रभावक्षेत्रांची चर्चा अधिक रंगू लागली आहे. विशेष म्हणजे, तुलनेने नवखे नेतृत्व मानल्या जाणाऱ्या शिंदेंचा प्रभाव झपाट्याने वाढताना दिसत आहे.

शिंदेंनी कोकण, ठाणे, नवी मुंबई, पालघर ते सातारा या पट्ट्यात निर्माण केलेले मजबूत राजकीय जाळे आता स्पष्टपणे जाणवू लागले आहे. रायगड पालकमंत्रीपद मिळवण्यापासून ते विविध ठिकाणी स्थानिक समीकरणे आपल्या बाजूने वळवण्यापर्यंत त्यांनी दाखवलेली राजकीय आक्रमकता लक्षवेधी ठरली आहे. ठाकरे गटातील काही खासदार आणि इतर पक्षांतील नेत्यांनाही शिंदेंचे राजकीय केंद्र महत्त्वाचे वाटू लागल्याची चर्चा दिल्लीतही सुरू आहे.

शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांसारखी उत्तुंग नेतृत्वे आजही प्रभावी असली तरी त्यांच्या पक्षांतर्गत अस्वस्थता आणि कार्यकर्त्यांतील संभ्रम वाढताना दिसतो. त्याउलट सत्तेच्या केंद्रस्थानी असलेल्या फडणवीस आणि शिंदे यांच्याकडे निर्णयक्षमता आणि सत्तेची व्यवहार्यता या दोन्ही नजरेतून पाहिले जात आहे. त्यामुळेच अनेक नेते आता विचारसरणीपेक्षा सत्तेच्या समीकरणांकडे अधिक झुकताना दिसतात.

या निवडणुकीपूर्वीच्या घडामोडींनी एक गोष्ट स्पष्ट केली आहे—महाराष्ट्राच्या राजकारणात पारंपरिक नेतृत्वाची छाया अजून कायम असली तरी नव्या सत्ताकेंद्रांचा प्रभाव झपाट्याने वाढत आहे. आणि सध्या त्या बदलत्या राजकारणाच्या केंद्रस्थानी एकनाथ शिंदे हे नाव अधिक ठळकपणे पुढे येताना दिसत आहे.

## प्रासंगिक »

### धनाचा विनियोग

**एकदा एक कोल्हा जमिनीत बीळ खणत असताना खूपच खोल खणत गेला. खूप खोल गेल्यावर त्याला तिथे एक धनाचा हंडा दिसला व त्यावर एक वृद्ध नाग त्या धनाचे रक्षण करत होता.**

कोल्ह्याने नागाला विचारले,"हे नाग-देवता, तुम्ही इथे काय करता आहात." नाग म्हणाला," माझ्या पूर्वजांनी पुरून ठेवलेल्या धनाचे मी रक्षण करत आहे." मग कोल्हा पुन्हा म्हणाला," पण इथं इतकं मोठं धन असताना तुम्ही कधी त्याचा उपभोग घेतला आहे किंवा नाही. उपभोग सोडा थोडंफार धन दानापोटी तरी खर्च केलंत काय" नाग म्हणाला," कसं शक्य आहे, हे धन कमी होऊ नये म्हणून तर मी स्वत: या धनाचे रात्रंदिवस डोळ्यात तेल घालून रक्षण करत आहे. त्याचा उपभोग घेणे किंवा दुस-याला दान देणे ह्यापेक्षा या धनाचे रक्षण करण्यातच मला जास्त आनंद आहे." हे ऐकून कोल्हा नागाला म्हणाला," मग नागदेवा, तुमच्या असल्या या श्रीमंतीपेक्षा मी गरीब आहे तोच बरा. ज्या धनाचा उपभोग घेतला जात नाही व ज्यातून दान केले जात नाही अशा धनाचा काय उपयोग"

- तात्पर्य : ज्या धनाचा योग्य विनियोग न होता केवळ संचय केला जातो त्या धनाचा मनुष्यमात्राला काहीच फायदा नाही.

प्रशांत महासागरात निर्माण होत असलेल्या एल निनोच्या प्रभावामुळे जगभरात दुष्काळ, अतिवृष्टी, तापमानवाढ आणि उष्णतेच्या लाटा यांसारख्या नैसर्गिक आपत्ती तीव्र होण्याचा इशारा जागतिक हवामान संघटनेने दिला आहे.

# वैश्विक संकटाची चाहूल

हा इशारा केवळ हवामानातील बदलांचा अहवाल नसून संपूर्ण मानवजातीसमोरील भविष्यातील गंभीर संकटाची चाहूल मानावी लागेल. मागील काही वर्षांत हवामान बदलाचे दुष्परिणाम जगातील सर्व देशांनी अनुभवले आहेत. आता येणारा काळ आणखी आव्हानात्मक ठरण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

एल निनो ही प्रशांत महासागरातील समुद्रपृष्ठाच्या तापमानवाढीशी संबंधित नैसर्गिक प्रक्रिया आहे. मात्र तिचा परिणाम संपूर्ण पृथ्वीच्या हवामानचक्रावर होतो. यंदाचा एल निनो हा 'सुपर एल निनो' ठरण्याची शक्यता असल्याने जगभरातील हवामानतज्ज्ञ चिंतेत आहेत. दक्षिण अमेरिका, आफ्रिका आणि मध्य आशियातील काही भागांत अतिवृष्टी, तर भारत, ऑस्ट्रेलिया, इंडोनेशिया आणि दक्षिण आशियातील अनेक भागांत पावसाचा अभाव आणि कोरडे हवामान राहण्याचा अंदाज आहे. त्यामुळे एका बाजूला महापूर तर दुसऱ्या बाजूला भीषण दुष्काळ अशी दुहेरी संकटे उभी राहू शकतात.

भारतासाठी ही परिस्थिती अधिक चिंताजनक आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा




मोठा भाग शेतीवर अवलंबून असून शेतीचे संपूर्ण गणित मान्सूनवर आधारित आहे. एल निनोमुळे पावसाचे प्रमाण घटल्यास शेती उत्पादन कमी होण्याची शक्यता आहे. त्याचा थेट परिणाम अन्नधान्य उपलब्धता, महागाई, ग्रामीण रोजगार आणि अर्थव्यवस्थेवर होणार आहे. आधीच अनेक राज्यांमध्ये पाण्याचे संकट गडद होत आहे. अशा वेळी कमी पर्जन्यमानामुळे दुष्काळाची तीव्रता आणखी वाढू शकते.

जागतिक तापमानवाढ ही या संकटामागील सर्वात मोठी समस्या आहे. औद्योगिकीकरण, जंगलतोड, प्रदूषण आणि हरितगृह वायूंच्या वाढत्या उत्सर्जनामुळे पृथ्वीचे तापमान सातत्याने वाढत आहे. 2023-24 मधील एल निनो हा इतिहासातील सर्वाधिक तीव्र एल निनोंपैकी एक मानला गेला. त्यामुळे 2024 हे वर्ष विक्रमी तापमानवाढीचे ठरले. पुढील काही वर्षांत 2027 किंवा 2028 ही पृथ्वीवरील सर्वांत उष्ण वर्षे ठरू शकतात, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

तापमानवाढीचे परिणाम केवळ पर्यावरणापुरते मर्यादित राहणार नाहीत. अन्नधान्य तुटवडा, महामारी, स्थलांतर, पाणीटंचाई आणि जागतिक अर्थकारणावरील ताण या समस्याही अधिक गंभीर बनू शकतात. त्यामुळे हवामान बदल हा आता फक्त पर्यावरणाचा विषय राहिलेला नाही; तर तो सामाजिक, आर्थिक आणि मानवी अस्तित्वाचा प्रश्न बनला आहे.

पॅरिस हवामान परिषदेत हरितवायू उत्सर्जन कमी करण्यासाठी विविध उपाययोजना सुचविण्यात आल्या होत्या. मात्र त्यांची प्रभावी अंमलबजावणी अद्याप पुरेशी झालेली नाही. विकसित आणि विकसनशील राष्ट्रांनी परस्पर दोषारोप न करता सामूहिक जबाबदारी स्वीकारणे आवश्यक आहे. अक्षय ऊर्जा, जलसंधारण, वृक्षारोपण आणि शाश्वत विकास यांवर भर देणे ही काळाची गरज बनली आहे.

## ।। अभंगवाणी ।।



वाळो जन मज म्हणोत शिंदळी ।
परि हा वनमाळी न विसंबें ॥१॥

सांडूनि लौकिक जालियें उदास ।
नाहीं भय आस जीवित्वाची ॥२॥

- संत तुकाराम

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक. (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# सिंधुदुर्ग जिल्ह्याची ऐतिहासिक कामगिरी

## जनगणना २०२७ टप्पा एक : घरगणना १०० टक्के पूर्ण करणारा राज्यातील पहिला जिल्हा

**महाईन्यूज । सिंधुदुर्ग**

**जनगणना २०२७ च्या पहिल्या टप्प्यातील घरगणना मोहिमेत सिंधुदुर्ग जिल्ह्याने ऐतिहासिक कामगिरी नोंदवत महाराष्ट्रात प्रथम क्रमांक पटकावला आहे. अवघ्या २० दिवसांच्या विक्रमी कालावधीत घरगणनेचे १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण करणारा सिंधुदुर्ग हा राज्यातील पहिला जिल्हा ठरला आहे. जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी तृप्ती धोडमिसे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा प्रशासनाने केलेल्या नियोजनबद्ध कामकाजामुळे हा मान जिल्ह्याला मिळाला आहे**



### “स्वगणना मोहिमेलाही उत्स्फूर्त प्रतिसाद”

जनगणना प्रक्रियेतील स्वगणना (SELF ENUMERATION) टप्पा १ मे ते १५ मे २०२६ या कालावधीत राबविण्यात आला होता. या टप्प्यात जिल्ह्यातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत डिजिटल माध्यमातून मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदविला. एकूण २९ हजार ५९१ घरांची स्वगणना पूर्ण झाली असून १७ गावे आणि एका नगरपंचायतीने शंभर टक्के स्वगणनेचे उद्दिष्ट गाठले. यामध्ये वेंगुर्ला तालुक्यातील ‘मूठ’ हे गाव सर्व कुटुंबांची स्वगणना पूर्ण करणारे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पहिले महसुली गाव ठरले. या यशामुळे जिल्ह्यातील नागरिकांची नागरी जबाबदारीची जाणीव आणि डिजिटल साक्षरता अधोरेखित झाली आहे.

जनगणना २०२७ च्या पहिल्या टप्प्यातील घरगणना मोहीम १६ मे २०२६ पासून सुरू करण्यात आली होती. या मोहिमेत जिल्ह्यातील ०८ तहसील कार्यालये, ०३ नगरपरिषदा आणि ०५ नगरपंचायती अशा एकूण १६ कार्यालयांचा सहभाग होता. जिल्ह्यातील २६० पर्यवेक्षक आणि १,४६० प्रगणकांनी अथक परिश्रम घेत १,४५१ घरयादी गटांची गणना यशस्वीरित्या पूर्ण केली.

या यशामागे जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे यांचे सूक्ष्म नियोजन, सातत्यपूर्ण आढावा बैठका, क्षेत्रीय अधिकाऱ्यांना दिलेले मार्गदर्शन आणि प्रत्यक्ष क्षेत्रभेटींतून समस्यांचे तत्काळ निराकरण यांचा मोठा वाटा राहिला. तसेच निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा जनगणना अधिकारी मच्छिंद्र सुकटे यांनीही संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांमुळे मोहिमेला गती मिळाली. तसेच प्रभारी अधिकारी म्हणून कर्तव्य पार पाडणाऱ्या तहसिलदार आणि मुख्याधिकारी यांनीही आपली जबाबदारी चोखपणे पार पाडली. जिल्हाधिकारी श्रीमती धोडमिसे यांनी सांगितले की, घरगणनेचा टप्पा यशस्वीरित्या पूर्ण झाल्यानंतर आता गुणात्मक पाहणी आणि अनियमितता दुरुस्तीची प्रक्रिया देखील मुदतीत पूर्ण करण्याचे नियोजन प्रशासनाने केले आहे.

जनगणना मोहिमेच्या यशात जिल्ह्यातील सर्व प्रगणक आणि पर्यवेक्षक यांचे योगदान मोलाचे ठरले. त्यांच्या शिस्तबद्ध कार्यपद्धती, समन्वय, समर्पण आणि टीमवर्कमुळेच ही ऐतिहासिक कामगिरी शक्य झाली. या उल्लेखनीय यशाबद्दल जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे यांनी सर्व प्रगणक, पर्यवेक्षक आणि संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्याने जनगणना २०२७ च्या पहिल्या टप्प्यात नोंदविलेली ही राज्यातील अग्रक्रमाची कामगिरी प्रशासनाची कार्यक्षमता, नियोजनबद्धता आणि जनसहभागाचे उत्कृष्ट उदाहरण ठरत असून, राज्यातील इतर जिल्ह्यांसाठीही ती प्रेरणादायी ठरणार आहे.

# वरळी डोममधील कन्सर्टनंतर तरुणाचा मृत्यू, तरुणी अत्यवस्थ

**महाईन्यूज । मुंबई**

**गोरेगाव येथील कन्सर्टमध्ये अमली पदार्थ सेवनामुळे दोन तरुणाचा मृत्यू झाल्याच्या घटनेची पुनरावृत्ती पुन्हा घडली आहे. वरळी डोममधील अशाच कार्यक्रमात मद्याचे सेवन केल्यानंतर एका तरुणाचा मृत्यू झाला तर याच कार्यक्रमातील तरुणीला अत्यवस्थ स्थितीत रुग्णालयात दाखल करण्यात आले. या प्रकरणी ताडदेव पोलीस ठाण्यात अपघाती मृत्यू नोंद करण्यात आली आहे. या कार्यक्रमात अमली पदार्थांचे सेवन केले होते का याची खात्री होऊ शकलेली नाही.**



### सीसीटीव्ही फुटेजची तपासणी

ताडदेव आणि वरळी पोलीस कार्यक्रमाचे सीसीटीव्ही (CCTV) फुटेज तपासत आहेत. तिथे उपस्थित असलेल्या इतर तरुणांचे आणि आयोजकांचे जबाब नोंदवले जात आहेत. गोरेगाव नेस्को प्रकरणासारखाच इथेही अंमली पदार्थांचा काही संबंध आहे का, याहष्टीने पोलीस फॉरेन्सिक तपास करत आहेत. दरम्यान, वृषभच्या मृत्यूचे नेमके कारण अद्याप अस्पष्ट आहे. शवविच्छेदन आणि वैद्यकीय अहवाल आल्यानंतरच मृत्यूचे खरे कारण स्पष्ट होईल.

वरळी येथील डोम सभागृहात आयोजित कार्यक्रमात मद्याचे तसेच एनर्जी पेयाचे सेवन केल्यानंतर काही वेळात २८ वर्षे वयाचा तरुण जागीच कोसळला. त्याला तात्काळ ब्रीच कँडी रुग्णालयात नेण्यात आले. मात्र रुग्णालयात दाखल करण्यापूर्वीच त्याला डॉक्टरांनी मृत घोषित केले. याच कार्यक्रमातील एका तरुणीला (३१ वर्षे) अत्यवस्थ वाटू लागल्याने जसलोक रुग्णालयात दाखल करण्यात आले. तिची प्रकृती आता स्थिर असल्याचे उपायुक्त जयंत मीना यांनी सांगितले. या तरुणीचा जबाब नोंदविण्यात आला असून त्यानुसार तिने मद्य आणि एनर्जी पेयाचे सेवन केले होते. त्यानंतर तिला काही वेळानंतर अस्वस्थ वाटायला लागले. अमली पदार्थांचे सेवन केलेले नाही, असे तिने सांगितले. संबंधित तरुण तसेच तरुणीची तपासणी करण्यासाठी रक्ताचे नमुने घेण्यात आले आहेत.

या कार्यक्रमात अमली पदार्थांचे सेवन करण्यात आले होते किंवा नाही, याची तपासणी सुरु असल्याचेही मीना यांनी सांगितले. संबंधित तरुणाच्या मृत्यूची चौकशी सुरु करण्यात आली आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. पोलिसांनी घटनास्थळी जाऊन सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेण्यात आले आहेत. याशिवाय या कार्यक्रमाला उपस्थितांची चौकशी सुरु करण्यात आली आहे. गोरेगाव येथील नेस्को मैदानात झालेल्या कन्सर्टमध्ये अमली पदार्थांचे सोवन केल्यामुळे दोन तरुणांचा मृत्यू झाला. त्यानंतर अशा कॉन्सर्टना परवानगी देण्यासाठी पोलिसांनी मार्गदर्शक सूचना जारी केल्या होत्या. याशिवाय स्थानिक उपायुक्तांवर जबाबदारी सोपविण्यात आली होती. आता पुन्हा अशी घटना घडल्यामुळे कसून चौकशी सुरु असल्याचे पोलिसांनी सांगितले.

गोरेगावात झालेल्या घटनेनंतर पोलीस आयुक्त देवेन भारती यांनी नव्याने सूचना जारी केल्या होत्या. यामध्ये फक्त पूर्व व पश्चिम उपनगरातील अशा कार्यक्रमांचा उल्लेख होता. शहरात प्रामुख्यानो असे कार्यक्रम होत नसत. आता वरळी डोममधील घटनेमुळे खळबळ माजली आहे.

# अमेरिकेत स्ट्रीट फेस्टिव्हलमध्ये थरार!

## अंदाधुंद गोळीबारात १२ जण जखमी, हल्लेखोरांचा शोध सुरू

**महाईन्यूज । अमेरिका**

**अमेरिकेतील टोलेडो, ओहायो येथे शनिवारी संध्याकाळी एका स्थानिक स्ट्रीट फेस्टिव्हल जवळ झालेल्या गोळीबारात १२ जण जखमी झाले असून, पोलीस सध्या या घटनेला जबाबदार असलेल्या संशयितांचा शोध घेत आहेत, अशी माहिती ‘असोसिएटेड प्रेस’ (AP) ने दिली आहे.**



टोलेडो पोलीस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी संध्याकाळी ५:३० च्या सुमारास ‘ओल्ड वेस्ट एंड फेस्टिव्हल’ (OLD WEST END FESTIVAL) जवळ एका व्यक्तीवर गोळीबार झाल्याची माहिती त्यांना मिळाली. पोलीस घटनास्थळी पोहोचले तेव्हा त्यांना तिथे गोळीबारात जखमी झालेले अनेक लोक आढळले, असे पोलीस विभागाने आपल्या निवेदनात म्हटले आहे. जखमी झालेल्या अनेक लोकांना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मात्र, जखमींची अचूक संख्या आणि त्यांच्या जखमांचे स्वरूप याबद्दल पोलिसांनी सध्या अधिक तपशील दिलेला नाही.

पोलीस सध्या संशयितांचा वेगाने शोध घेत असून हा गोळीबार नेमका कोणत्या कारणांमुळे आणि कसा झाला, याचा तपास करत आहेत. ‘ओल्ड वेस्ट एंड फेस्टिव्हल’ हा टोलेडोच्या ऐतिहासिक भागात साजरा केला जाणारा दोन दिवसांचा उत्सव आहे, ज्यामध्ये लाईव्ह म्युझिक (थेट संगीत), खाद्यपदार्थांचे स्टॉल्स, ऐतिहासिक घरांची सफर आणि खरेदी (शॉपिंग) यांचा समावेश असतो.या घटनेबाबत अधिक माहिती मिळवण्यासाठी शनिवारी संध्याकाळी टोलेडो पोलीस विभागाशी ईमेल आणि फोनद्वारे संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, त्यांच्याकडून तात्काळ कोणताही प्रतिसाद मिळाला नाही.

केविन बेरी हे नौदलातील माजी सैनिक असून त्यांना वैद्यकीय क्षेत्राचा अनुभव आहे. गोळीबार सुरू झाला तेव्हा ते शेजारच्याच एका उद्यानात (ARBORETUM) लाईव्ह म्युझिक ऐकत बसले होते. “गोळीबार सुरू होताच प्रत्येक जण जमिनीवर झोपला”, बेरी यांनी अचानक झालेल्या गोंधळाची आठवण सांगताना म्हटले. जेव्हा त्यांनी वर पाहिले, तेव्हा अवघ्या ५० फुटांपेक्षा कमी अंतरावर एक बंदूक जमिनीवर फेकून दिली जात असल्याचे त्यांनी पाहिले. उत्सवाच्या बंदोबस्तासाठी आधीपासूनच तिथे तैनात असलेल्या पोलीस अधिकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. आपल्या वैद्यकीय अनुभवाचा वापर करत, बेरी यांनी कोणाला तातडीच्या वैद्यकीय मदतीची गरज आहे का हे पाहण्यासाठी परिसराची पाहणी केली. त्यांनी तिथे गोळी लागून जखमी झालेले किमान पाच लोक पाहिले. “गोळी लागलेले लोक उद्यानाच्या परिसरात वेगवेगळ्या ठिकाणी पडले होते,” असे बेरी यांनी नमूद केले.

### अधिकाऱ्यांनी व्यक्त केली चिंता

ओहायोचे गव्हर्नर माईक डीव्हाईन आणि टोलेडो सिटी कौन्सिलच्या सदस्या थेरेसा मॉरिस या दोघांनीही या हिंसेबद्दल तीव्र चिंता व्यक्त केली आहे. “आज रात्री टोलेडोमध्ये झालेल्या या प्रकारामुळे मी अत्यंत चिंतेत आहे”, गव्हर्नर डीव्हाईन म्हणाले. “उन्हाळी उत्सव हे कुटुंबांसाठी हिंसेच्या भीतीशिवाय एकत्र वेळ घालवण्याची सुरक्षित ठिकाणे असायला हवीत. या दुर्दैवी घटनेचा वर्षानुवर्षे या उत्सवाला भेट देणाऱ्या आणि आनंद घेणाऱ्या नागरिकांवर आणि पर्यटकांवर मोठा मानसिक परिणाम झाला आहे”, मॉरिस यांनी पुढे जोडले.

# टीएमसीचे आमदार मदन मित्रा यांच्या वाहनावर अंडी फेकत हल्ला

**महाईन्यूज । पश्चिम बंगाल**

**गेल्या काही दिवसांपासून पश्चिम बंगालमध्ये अनेक घडामोडी पाहायला मिळत आहेत. टीएमसीचे खासदार अभिषेक बॅनर्जी यांच्यावर काही दिवसांपूर्वी हल्ला झाल्याची घटना घडली होती. त्यानंतर टीएमसीचे खासदार कल्याण बॅनर्जी यांच्यावरही हल्ला करण्यात आल्याची घटना घडली होती. त्यामुळे पश्चिम बंगालमध्ये मोठी खळबळ उडाली होती. यानंतर आता तृणमूल काँग्रेसचे ज्येष्ठ आमदार मदन मित्रा यांच्या वाहनावर जमावाकडून हल्ला करण्याचा प्रयत्न झाल्याची माहिती समोर आली आहे.**







पश्चिम बंगालमधील कामरहाटी मतदारसंघाचे तृणमूल काँग्रेसचे आमदार मदन मित्रा यांच्या ताफ्यावर कथितरित्या अंडी फेकण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. या संदर्भातील एक व्हिडीओ देखील सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. या व्हिडीओमध्ये आमदार मदन मित्रा यांना काही नागरिकांच्या रोषाला सामोरं जावं लागत असल्याचं दिसून आलं आहे.

दरम्यान, ही घटना आरियादाहा परिसरात घडली आहे. या ठिकाणी आधीच काही स्थानिक रहिवाशांचं आंदोलन सुरू होतं. या ठिकाणी आमदार मदन मित्रा यांचा ताफा दाखल झाला. मात्र, यावेळी काही आंदोलकांनी आमदार मदन मित्रा यांच्या वाहनावर अंडी फेकली. त्यामुळे आमदार मदन मित्रा यांना तेथून निघून जावं लागलं. दरम्यान, हल्ला करण्यात आला तेव्हा आपण वाहनात नव्हतो असा दावा मित्रा यांनी केला. मात्र, या गोंधळादरम्यान त्यांच्या चालकाला मारहाण झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

कामरहाटी मतदारसंघाचे तृणमूल काँग्रेसचे आमदार मदन मित्रा यांच्या ताफ्यावर कथितरित्या हल्ला झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेला आमदार मदन मित्रा यांनी भाजपा-समर्थित समाजकंटकांना जबाबदार धरलं आहे. तर भाजपा नेत्याने या घटनेवर प्रतिक्रिया देत हा हल्ला स्वतः मदन मित्रा यांनी घडवून आणल्याचा आरोप केला. आमदार मदन मित्रा यांच्या गाडीवरील हल्ल्यावर प्रतिक्रिया देताना मंत्री अर्जुन सिंह यांनी म्हटलं की, “त्याने स्वतःच्याच माणसांकडून स्वतःच्याच गाडीवर हल्ला घडवून आणला आहे, जेणेकरून त्याला संरक्षण मिळू शकेल.”


### नेमकं काय घडलं?

कामरहाटीमधील वॉर्ड क्रमांक १४ मधील एका नगरसेवकाच्या निवासस्थानाबाहेर काही स्थानिक रहिवाशांचं आंदोलन सुरू होतं. या आंदोलनात ऑटो-रिक्षा आणि ई-रिक्षा चालक एकत्र जमले होते. अनेक वर्षांपासून ‘कट मनी’ म्हणून कथितरित्या दिलेल्या पैशांच्या परताव्याची मागणी करण्यासाठी ते आंदोलन करत होते. यावेळी या आंदोलकांनी स्थानिक नेत्यांवर बेकायदेशीर लाच घेतल्याचा आरोप करत जोरदार घोषणाबाजी केली.

# बोल्ड सीनवरून वाद



राम चरण आणि जान्हवी कपूर यांचा 'पेद्दी' चित्रपट सध्या बॉक्स ऑफिसवर दमदार कमाई करत असून अवघ्या तीन दिवसांत चित्रपटाने तब्बल 100 कोटी रुपयांचा टप्पा पार केला आहे. मात्र, चित्रपटाच्या यशासोबतच जान्हवी कपूरच्या भूमिकेवरून आणि तिच्या वेशभूषेवरून निर्माण झालेला वादही चांगलाच चर्चेत आहे. चित्रपटात जान्हवी कपूरला अतिशय ग्लॅमरस आणि बोल्ड अंदाजात सादर करण्यात आल्याने काही प्रेक्षकांनी नाराजी व्यक्त केली होती. सोशल मीडियावर टीकेची लाट उसळल्यानंतर चित्रपटाचे दिग्दर्शक बुची बाबू सना यांनी सार्वजनिकरित्या माफी मागितली होती. मात्र, त्यानंतरही हा वाद शांत झालेला नाही. आता या प्रकरणाला नवे वळण मिळाले असून जान्हवी कपूरचे कथित चॅटचे स्क्रीनशॉट्स सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. हे स्क्रीनशॉट्स अभिनेत्रीच्या फॅन क्लबकडून शेअर करण्यात आले असून, त्यामध्ये जान्हवीने चित्रपटातील काही विशिष्ट कॅमेरा अँगल्सबाबत आक्षेप घेतल्याचा दावा करण्यात आला आहे. व्हायरल होत असलेल्या स्क्रीनशॉट्सनुसार, जान्हवीने शूटिंगदरम्यान तिच्या छाती आणि कंबरेवर केंद्रित शॉट्स न घेण्याची विनंती केली होती. तसेच, अभिनेता राम चरण यांनीही तिच्या बाजूने हस्तक्षेप करत अशा प्रकारचे शॉट्स टाळण्यास सांगितल्याचा दावा या चॅटमध्ये करण्यात आला आहे. कथित संभाषणात जान्हवीने राम चरण यांचे कौतुक करत, त्यांनी तिच्या भावना समजून घेतल्या आणि संबंधित बाबींवर नाराजी व्यक्त केल्याचे नमूद केले आहे. या चॅटमध्ये उल्लेख केलेली व्यक्ती दिग्दर्शक बुची बाबू सना असल्याचेही सांगितले जात आहे.



## माधुरी दीक्षित आणि अनिल कपूर यांची जोडी पुन्हा एकदा कॅमेऱ्यासमोर

अभिनेत्री माधुरी दीक्षित आणि अनिल कपूर यांनी अनेक सुपरहिट चित्रपटांमध्ये काम केले आहे. या ऑनस्क्रीन जोडीला प्रेक्षकांचे प्रचंड प्रेम मिळाले. आता या दोघांची जोडी पुन्हा एकदा कॅमेऱ्यासमोर आली आहे. माधुरी दीक्षितचा मां बहन हा सिनेमा नुकताच ओटीटीवर प्रदर्शित झाला आहे. नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झालेला हा सिनेमा प्रदर्शित झाल्यानंतर त्याला प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळत असल्याचे पाहायला मिळत आहेत. या सिनेमाचे नुकतेच स्क्रिनिंग झाले. यावेळी अनेक कलाकारांनी हजेरी लावली होती. यावेळी अनिल कपूरदेखील हजर होते. यावेळी दोघांनी एकत्र फोटो काढले. सध्या त्यांचा व्हिडिओ सोशल मिडियावर तुफान व्हायरल होत आहे. सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या व्हिडीओमध्ये पाहायला मिळते की अनिल कपूर यांनी काळ्या रंगाचे कपडे परिधान केले आहेत. तर माधुरीने पिवळ्या व निळ्या रंगाचा ड्रेस घातला होता.

# साई पल्लवीचा फेव्हरेट हिरो कोण?



दक्षिण चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री साई पल्लवी तिच्या नैसर्गिक सौंदर्य, दमदार अभिनय आणि अप्रतिम नृत्यकौशल्यामुळे प्रेक्षकांच्या मनात विशेष स्थान निर्माण करण्यात यशस्वी ठरली आहे. ग्लॅमरच्या आड न जाता केवळ आपल्या अभिनयाच्या जोरावर तिने स्टारडम मिळवले असून देशभरात तिचा मोठा चाहतावर्ग आहे. अलीकडेच एका मुलाखतीदरम्यान साई पल्लवीने तिच्या चित्रपट प्रवासाविषयी बोलताना तिच्या आवडत्या अभिनेत्याचाही उल्लेख केला. लहानपणापासूनच चित्रपटांची आवड असलेल्या साई पल्लवीला एका दिग्गज अभिनेत्यामुळे अभिनयाची प्रेरणा मिळाल्याचे तिने आवर्जून सांगितलं. विशेष म्हणजे, तिने ज्या अभिनेत्याचे नाव घेतले ते ऐकून अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला. स्वतःपेक्षा वयाने खूप मोठ्या असलेल्या या अभिनेत्याला ती आपला आवडता हिरो मानते, असे सांगत साई पल्लवीने कोणताही संकोच न बाळगता त्या अभिनेत्याविषयीचा आदर आणि प्रेम व्यक्त केले. तिच्या मते, हा अभिनेता केवळ उत्कृष्ट कलाकार नाही तर एक महान व्यक्तिमत्त्वही आहे. त्यांचा चित्रपटातील संघर्ष, यश आणि कारकीर्द अनेक तरुण कलाकारांसाठी प्रेरणादायी असल्याचेही तिने नमूद केले. साई पल्लवीने ज्यांचे नाव घेतले ते म्हणजे दक्षिणेतील मेगास्टार चिरंजीवी. अनेक दशकांपासून चित्रपटसृष्टीवर अधिराज्य गाजवणाऱ्या चिरंजीवींचा प्रभाव आजही कायम असून ते नव्या पिढीतील कलाकारांसाठी प्रेरणास्थान मानले जातात. अनेकांचे ते आवडते अभिनेते असून साई पल्लवी देखील त्यांची खूप मोठी फॅन आहे. साई पल्लवीच्या चिरंजीवी यांचं नाव घेतल्यानंतर सोशल मीडियावर चाहत्यांमध्ये मोठी चर्चा रंगली आहे. अनेकांनी "प्रतिभा ही प्रतिभेलाच ओळखते" अशा प्रतिक्रिया देत साई पल्लवीच्या निवडीचे कौतुक केले आहे. अभिनयाला सर्वाधिक महत्त्व देणाऱ्या साई पल्लवीने चिरंजीवी यांना आपला सर्वकालीन आवडता नायक म्हटल्याने चिरंजीवी यांच्या चाहत्यांमध्येही आनंदाचे वातावरण आहे.



# मोहम्मद शमी इज बॅक!

## मोहम्मद शमीचे निवडकर्त्यांना चोख प्रत्युत्तर; 'या' टी-२० लीगमध्ये घेतली हॅटट्रिक!

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**भारतीय संघाबाहेर असलेला वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीने शनिवारी (दि. ६) बंगाल टी-२० लीगमध्ये हॅटट्रिक घेत मोठी कामगिरी केली. शनिवारी ईडन गार्डन्सवर सर्वोटेक सिलिगुडी स्ट्रायकर आणि श्राची राढ टायगर्स यांच्यात खेळल्या गेलेल्या सामन्यात त्याने या स्पर्धेतील पहिली हॅटट्रिक घेतली. त्याच्या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर सिलिगुडी स्ट्रायकर संघाने हा सामना २४ धावांनी जिंकला.**



सिलिगुडीने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ४ बाद २०८ धावा केल्या होत्या. विशालने संघासाठी ४६ चेंडूत ८६ धावांची धडाकेबाज खेळी केली. त्याने आपल्या खेळीत ६ षटकार आणि ५ चौकार मारले. या आव्हानाचा पाठलाग करताना श्राची राढ टायगर्स संघाला २० षटकांत ४ बाद १८४ धावाच करता आल्या. संघाकडून शुवम डे याने २५ चेंडूत ४८ आणि राहुलने २६ चेंडूत ४४ धावा केल्या.

याआधी मोहम्मद शमीने २०१९ च्या एकदिवसीय विश्वचषकातही हॅटट्रिक घेतली होती. त्याने अफगाणिस्तानविरुद्धच्या सामन्यात मोहम्मद नबी, आफताब आलम आणि मुजीब उर रहमान यांना बाद करून ही कमाल केली होती. तसेच घरगुती क्रिकेटमध्येही शमीने ही कामगिरी केली आहे. त्याने मध्य प्रदेशविरुद्धच्या रणजी ट्रॉफी सामन्यात तीन चेंडूंत तीन बळी घेतले होते. चेतन शर्मा यांच्यानंतर एकदिवसीय विश्वचषक सामन्यात हॅटट्रिक घेणारा मोहम्मद शमी हा दुसरा भारतीय गोलंदाज ठरला आहे.

मोहम्मद शमी गेल्या बऱ्याच काळापासून भारतीय संघाबाहेर आहे. यावरुन शमी आणि मुख्य निवडकर्ता यांच्यात निवडीवरून वादही झाला होता. शमीने स्वतःला फिट घोषित केले होते, मात्र निवड समिती त्याला फारशी दाद देत नव्हती. शमीने भारतासाठी ६४ कसोटी सामन्यात २२९ बळी घेतले आहेत. तर १०८ एकदिवसीय सामन्यांमध्ये त्याने २०६ बळी घेतले आहेत. ही हॅटट्रिक करत मोहम्मद शमीने पुन्हा एकदा आपल्या गोलंदाजीची धार कायम असल्याचे सिद्ध केले. अनुभवी वेगवान गोलंदाज म्हणून मोठ्या सामन्यांमध्ये निर्णायक कामगिरी करण्याची त्याची क्षमता पुन्हा अधोरेखित झाली आहे.

### लिलावात लागली मोठी बोली

सर्वोटेक सिलिगुडी स्ट्रायकर संघाने खरेदी केलेल्या खेळाडूंमध्ये भारतीय वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीचे नाव सर्वात चर्चेत राहिले, त्याला ५.२० लाख रुपयांना संघात सामील करण्यात आले. तर बंगालचा वेगवान गोलंदाज ईशान पोरेल याला २.५० लाख रुपयांना खरेदी करण्यात आले. फ्रँचायझीने करण लालसाठीही मोठी बोली लावत त्याला ८ लाख रुपयांना आपल्या संघात घेतले, ज्यामुळे तो बंगाल टी-२० लीग पुरुषांच्या लिलावात पहिल्या १० सर्वात महागड्या खेळाडूंमध्ये सामील झाला.

### शमीने १६ व्या षटकात घेतली हॅटट्रिक

वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीने डावातील १६ व्या षटकात सलग तीन चेंडूंवर तीन बळी घेतले. त्याने चौथ्या चेंडूवर शाहबाज अहमदला बाद केले. त्यानंतर पुढील चेंडूंवर रोहित कुमार आणि दीपांजन मुखर्जी यांना बाद करत आपली हॅटट्रिक पूर्ण केली. शमीने ४ षटकांत २७ धावा देत ४ बळी घेतले. करण लालनेही ३६ धावा देत तीन बळी घेतले. या भेदक गोलंदाजीच्या जोरावर प्रतिस्पर्धी संघाचा डाव पूर्णपणे कोलमडला आणि सामन्यावर शमीच्या संघाने मजबूत पकड मिळवली.

## वैभव सुर्यवंशी-अभिषेक शर्मा देणार सलामी.. तिलक ३ऱ्या नंबरवर!

**महाईन्यूज । मुंबई**

**भारतीय टी-२० क्रिकेटमध्ये श्रेयस अय्यरच्या रूपाने एका नवीन युगाचा उदय झाला असून, कर्णधारपदाची धुरा आता त्याच्या खांद्यावर सोपवण्यात आली आहे. या बदलासोबतच संघात तरुण आणि स्फोटक फलंदाज वैभव सूर्यवंशीचे आगमन झाले आहे. आपल्या आक्रमक फलंदाजीच्या जोरावर स्वतःची छाप पाडत वैभवने भारतीय संघात आपले स्थान पक्के केले आहे.**




श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ आता आयर्लंडविरुद्धच्या मालिकेने आपल्या मोहिमेची सुरुवात करणार आहे, त्यानंतर इंग्लंड दौऱ्यावर पाच टी-२० सामन्यांची महत्त्वपूर्ण मालिका खेळली जाणार आहे.

संघाच्या रचनेत मोठे बदल न करता, निवड समितीने अनुभवी कुलदीप यादवऐवजी रवी बिश्नोईवर विश्वास दाखवण्याचा निर्णय घेतला आहे. फिरकी गोलंदाजीची धुरा रवी बिश्नोई आणि वरुण चक्रवर्ती यांच्या खांद्यावर असेल. संघात श्रेयस, वैभव आणि रवी यांच्या समावेशानंतर प्रतिस्पर्धी संघांना धूळ चारण्यासाठी 'बेस्ट प्लेइंग इलेव्हन' कशी असावी, याबाबत एआयने (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) एक सविस्तर विश्लेषण केले आहे.

जेव्हा एआयला विचारण्यात आले की, संजू किंवा इशान यांना पाचव्या क्रमांकावर का ठेवले आहे, तेव्हा स्पष्टीकरण देताना एआयने म्हटले की, संघाचे सलामीचे स्लॉट सध्या पूर्णपणे भरलेले आहेत. वैभव सूर्यवंशीने आयपीएलमध्ये केलेल्या धमाकेदार कामगिरीनंतर त्याला सलामीच्या जागेवरून हटवणे कठीण आहे. तसेच, त्याच्या जोडीला अभिषेक शर्मा आणि तिसऱ्या क्रमांकावर उपकर्णधार तिलक वर्मा यांची जागा भक्कम आहे. श्रेयस अय्यर चौथ्या क्रमांकावर असल्यामुळे, पहिल्या चार क्रमांकांमध्ये कोणताही बदल करणे सध्याच्या घडीला कठीण आहे. त्यामुळे, यष्टीरक्षक म्हणून जो कोणी खेळाडू संघात असेल, त्याला पाचव्या क्रमांकावर फलंदाजी करावी लागेल. एआयच्या मते, कागदावर संजू किंवा इशान हे पाचव्या क्रमांकावर दिसत असले, तरी टी-२० हा परिस्थितीनुसार खेळला जाणारा खेळ आहे.

### सचिनचा विक्रम मोडण्याची संधी

भारताचा संघ २६ आणि २८ जून रोजी आयर्लंडविरुद्ध दोन टी-२० सामने खेळणार आहे. त्यानंतर १ ते ११ जुलैदरम्यान इंग्लंडविरुद्ध पाच सामन्यांची टी-२० मालिका खेळली जाईल. वैभव सूर्यवंशीला या मालिकांमध्ये संधी मिळाल्यास तो भारताकडून आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळणारा सर्वात युवा पुरुष क्रिकेटपटू ठरेल. यापूर्वी हा विक्रम सचिन तेंडुलकरच्या नावावर आहे. सचिनने १५ नोव्हेंबर १९८९ रोजी पाकिस्तानविरुद्ध कराची येथे वयाच्या १६ वर्षे २०५ दिवसांत कसोटी पदार्पण केले होते. २६ जून रोजी आयर्लंड विरूद्ध बेलफास्ट येथे पहिला टी-२० सामना होणार आहे. यामध्ये सुर्यवंशीला संधी मिळाली तर सचिन तेंडुलकरपेक्षा सुमारे १ वर्ष आणि ११४ दिवस लहान वयात पदार्पण करणारा सर्वात तरूण खेळाडू ठरणार आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY
# महाईन्यूज ™
ePaper
। सोमवार ।
दि. 08 जून 2026 ।
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# पिंपरी-चिंचवडमधील सुरक्षारक्षकांचे हाल कायम

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

पिंपरी-चिंचवड शहरातील सुमारे पाच हजारांपेक्षा जास्त सुरक्षारक्षकांना आजही किमान वेतनापासून वंचित राहावे लागत असल्यामुळे वाढत्या महागाईमुळे त्यांचे जगणे अधिकच कठीण झाले आहे. दिवसाला आठ तास ड्युटी करुन इतर छोटे-मोठे कामे सांभाळूनही पुरेसे वेतन मिळत नसल्याची खंत सुरक्षारक्षकांनी व्यक्त केली आहे.


समान कामाला समान वेतन या तत्त्वानुसार कामाचे मूल्य ठरले गेले, तर आम्हालाही सन्मानाने जीवन जगता येईल, अशी भावना अनेक सुरक्षारक्षकांनी व्यक्त केली आहे. पुणे, पिंपरी चिंचवड, मावळ शहरात सुमारे ५००० हजारांहून अधिक आस्थापनांमध्ये सुरक्षारक्षक आपले कर्तव्य निभावत असून, तेथे मात्र त्यांना योग्य वेतन, सुट्या किंवा कामाच्या तासांची हमी मिळत नाही. कामामध्ये शोषण होत असल्याचा आरोप विविध सुरक्षारक्षक संघटनेने केला आहे. नोंदणीकृत सुरक्षारक्षकांसाठी किमान वेतन निश्चित करण्यासाठी बऱ्याच वर्षांपासून चर्चा सुरू आहे. मात्र, प्रभावी निर्णयाची अंमलबजावणी आजतागायत झालेली नाही.

परिणामी अनेक सुरक्षारक्षकांना महिन्याला पंधरा ते वीस हजार रुपयांवर काम करावे लागत आहे. पुणे जिल्हा सुरक्षारक्षक मंडळालाही भरघोष निधी मिळालेला नसल्याने सुरक्षारक्षकांच्या विविध कल्याणकारी योजना रखडल्या आहेत. रोजगार करार नसणे, अपूर्ण नोंदणी प्रक्रिया आणि कायदेशीर स्वसंरक्षणाचा अभाव यामुळे सुरक्षारक्षकांना अन्याय सहन करावा लागत आहे. सुरक्षारक्षक संघटनांनी शासनाकडे नियमित नोंदणी वेतन, श्रेणी विमा योजना आणि सामाजिक सुरक्षा योजना तातडीने लागू करण्याची मागणी केली आहे. कामाच्या स्वरूपानुसार वेतनात मोठी तफावत असल्याचेही समोर आले आहे. तुटपुंजे वेतन असूनही ते वेळेवर मिळत नसल्याने महिन्याचे बजेट कोलमडले जाते.

### कर्ज देण्यास टाळाटाळ

मंडळात काम करून दहा वर्षे झाले तरी सुरक्षारक्षकांना एकच लाख रुपये कर्ज दिले जात आहे. घर दुरुस्ती, मुलांचे शिक्षण, लग्न, घरातील व्यक्तींचे आजारपण यासाठी मिळणाऱ्या कर्जाची रक्कम फार कमी आहे. त्यात ते वेळेवर मिळत नाही. कर्जाच्या रकमेत दुप्पट वाढ करून सुरक्षारक्षकांना न्याय द्यावा, अशी मागणी सुरक्षारक्षकांनी केली आहे.



# पिंपळे गुरवमध्ये शाळेची इमारत ५ वर्षांपासून रखडलेली

## कै. शेवंताबाई जगताप विद्यालयाच्या अपूर्ण बांधकामामुळे शेकडो विद्यार्थ्यांचा धोकादायक प्रवास

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या संथ आणि उदासीन कारभाराचा फटका पिंपळे गुरवमधील शेकडो विद्यार्थ्यांना बसत असल्याचे चित्र समोर आले आहे. येथील कै. शेवंताबाई खंडूजी जगताप विद्यालयाच्या नवीन इमारतीचे बांधकाम तब्बल पाच वर्षांपासून रखडले असून, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणासोबतच त्यांच्या सुरक्षिततेचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.**



रखडलेल्या कामामुळे पालक, नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण असून, प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

एकीकडे शहरात स्मार्ट सिटीच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांची विकासकामे होत असल्याचे दावे केले जात असताना दुसरीकडे विद्यार्थ्यांना सुरक्षित व सुसज्ज शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यात प्रशासन अपयशी ठरत असल्याची भावना स्थानिकांमध्ये व्यक्त होत आहे. अनेक निवेदने पाठपुरावा आणि मागण्या करुनही कामाला गती मिळत नसल्याने संताप वाढत आहे.

या संपूर्ण प्रकरणाबाबत महापालिकेच्या स्थापत्य विभागाकडे निवेदने देण्यात आली आहेत. मात्र, प्रत्यक्षात कामाला अपेक्षित गती मिळालेली दिसून येत नाही. परिस्थितीची पूर्ण माहिती असूनही प्रशासनाकडून ठोस भूमिका घेतली जात नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे.

शहराच्या विकासाच्या मोठमोठ्या गप्पा मारणाऱ्या प्रशासनाला स्वतःच्या हद्दीतील एका शाळेचे बांधकाम पाच वर्षांत पूर्ण करता येत नसेल तर विकासाच्या दाव्यांवर प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असताना महापालिका आता तरी जागी होणार का? असा सवाल पिंपळे गुरवकरांकडून उपस्थित केला जात आहे. जगताप विद्यालयाच्या रखडलेल्या कामाकडे प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि सुसज्ज शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी परिसरातून होत आहे.

### जीव मुठीत धरून शाळेचा प्रवास

नवीन इमारतीचे काम अपूर्ण असल्यामुळे जगताप विद्यालयातील विद्यार्थ्यांचे शिक्षण सध्या शेल पेट्रोल पंपाजवळील पर्यायी शाळेत सुरू आहे. मात्र, हा पर्याय विद्यार्थी आणि पालकांसाठी मोठी डोकेदुखी ठरत आहे. सुदर्शननगर वैदुवाडी प्रभातनगर, जवळकरनगर तसेच परिसरातील विद्यार्थ्यांना दररोज लांबचा प्रवास करावा लागत आहे. शाळेत जाण्यासाठी त्यांना मोठ्या वाहतुकीच्या रस्त्यांवरून जावे लागते. या मार्गांवर अवजड वाहने भरधाव दुचाकी आणि वाढती वाहतूक असल्याने अपघाताचा धोका कायम निर्माण झाला आहे.

“ शाळेच्या पटांगणात एका कुटुंबाचे घर असल्यामुळे बांधकामाचे काम काही काळ बंद होते. कुटुंबाला मोबदला दिल्यानंतर पुन्हा कामाला सुरुवात करण्यात आली आहे. तसेच, निवडणुकीच्या कामामुळेही काही प्रमाणात विलंब झाला होता. सुरुवातीला जी प्लस टू इमारतीचे नियोजन होते. मात्र, आता त्या ठिकाणी पाच मजली शाळेची इमारत उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार बिल्डिंग परवानगीही घेण्यात आली असून, सर्वसाधारण सभेची मान्यता मिळाल्यानंतर मूळ आराखड्यानुसार पाच मजली इमारत उभारली जाणार आहे. या कामाची वर्क ऑर्डर 2023 मध्ये देण्यात आली असून, पुढील वर्षापासून शाळा सुरू करण्याचे नियोजन आहे.

**- प्रसाद देशमुख, उपअभियंता, ड क्षत्रिय कार्यालय, महापालिका.**

# संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्यासाठी नवा हायटेक रथ तयार

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराजांच्या ३४१ व्या आषाढी पायी वारी पालखी सोहळ्यासाठी अत्याधुनिक आणि आकर्षक असा नवीन पालखी रथ तयार करण्यात येत असून, या रथाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे.**



संगम साधणारा हा रथ यंदाच्या आषाढी वारीचे विशेष आकर्षण ठरणार आहे. त्यामुळे जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांचा आषाढी पायीवारी सोहळा हायटेक रथातून संपन्न होणार आहे. हा रथ बर्माटिक लाकडापासून बनवण्यात आला असून, या लाकडावर दाक्षिण्य शैलीत कोरीव असे नक्षीकाम करण्यात आले आहे. त्याला तीनशे किलो चांदीचा मुलामा देण्यात येणार आहे. या रथाचे वजन पहिल्या रथापेक्षा सहाशे किलोने कमी असणार आहे.

विशेष म्हणजे, नवीन रथामध्ये सुमारे दोन टन बर्मा टीक सागवानी लाकडाचा वापर करण्यात आला असून, रथाचे एकूण वजन सुमारे चार टन आहे. मात्र, जुन्या रथाच्या तुलनेत हा रथ सुमारे ६०० किलोने हलका असणार आहे. त्यामुळे पालखी सोहळ्यादरम्यान बैलजोडींना रथ ओढणे अधिक सुलभ होणार असून, वारीदरम्यान सुरक्षितता व स्थिरताही वाढणार आहे. रथाच्या बांधकामात मजबुतीसह आधुनिक तांत्रिक बाबींचाही विचार करण्यात आल्याने तो अधिक टिकाऊ व दीर्घकाळ वापरण्यायोग्य ठरणार आहे. यंदा जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराजांचा ३४१ वा आषाढी पायी वारी पालखी सोहळा ७ जुलै रोजी श्रीक्षेत्र देहू येथून पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहे. त्यापूर्वी नवीन पालखी रथाचे सर्व काम पूर्ण करून तो सेवेसाठी सज्ज करण्यात येणार असल्याची माहिती श्री संत तुकाराम महाराज संस्थानचे विश्वस्त दिलीपमहाराज मोरे, वैभवमहाराज मोरे तसेच पालखी सोहळा प्रमुख विक्रमसिंह मोरे यांनी दिली. "परंपरेचा पवित्र वारसा आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा सुंदर संगम साधणारा हा नवीन रथ यंदाच्या आषाढी वारीचे प्रमुख आकर्षण ठरणार असून, लाखो वारकऱ्यांसाठी तो विशेष श्रद्धेचा आणि अभिमानाचा विषय ठरणार आहे."

### रथासाठी कर्नाटकातील लाकडांचा वापर

नवीन पालखी रथाच्या निर्मितीसाठी कर्नाटक राज्यातील दांडोली परिसरातून आणलेल्या उच्च दर्जाच्या बर्मा टीक (सागवान) लाकडांचा वापर करण्यात आला आहे. रथ निर्मितीसाठी सुमारे १५० घनफूट लाकूड वापरण्यात आले असून, त्यावर अत्यंत सुबक व कलात्मक कोरीव नक्षीकाम करण्यात आले आहे. हे कोरीव काम राजस्थान राज्यातील सिरोही गावात कोंढवा येथील स्वामी आर्टचे सुरेश मिस्त्री यांनी कुशल कारागिरांकडून करून घेतले असून, त्यासाठी जवळपास दोन महिन्यांचा कालावधी लागला आहे.

### रथावर सांस्कृतिक प्रतिकृती

रथावरील नक्षीकाम दक्षिणात्य स्थापत्यशैलीवर आधारित असून, विविध धार्मिक व सांस्कृतिक प्रतिकृतींमुळे रथ अधिक देखणा आणि भव्य बनत आहे. याशिवाय, रथावरील लाकडी कोरीव कामावर सुमारे ३०० किलो चांदीचा मुलामा व सजावटीचे काम करण्यात येत आहे. त्यामुळे रथाचे सौंदर्य अधिक खुलून येणार आहे. या रथाची निर्मिती पारंपरिक कारागिरी आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा संगम साधत अत्यंत बारकाईने केली जात आहे. प्रत्येक नक्षी, शिल्प आणि सजावटीच्या घटकातून भारतीय संस्कृती, अध्यात्म आणि कलावैभवाचे दर्शन घडणार आहे. भाविकांसाठी हा रथ केवळ धार्मिक श्रद्धेचे प्रतीक नसून, उत्कृष्ट शिल्पकलेचा आणि सांस्कृतिक वारशाचा भव्य नमुना ठरणार आहे.

# महापालिकेला 10 कोटींचा फटका

## पवित्र पोर्टलवरील तांत्रिक त्रुटीमुळे 81 शिक्षकांना वेतन फरक देण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे आदेश

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शिक्षण विभागाने राज्य शासनाच्या पवित्र पोर्टलवरून शिक्षणसेवकांची भरती करताना केलेल्या तांत्रिक चुकीमुळे तब्बल 10 कोटींचा फटका बसला आहे. चूक असतानाही महापालिकेने उच्च, सर्वोच्च न्यायालयापर्यंत धाव घेतली. न्यायालयाने महापालिकेला फटकारत जाहिरातीनुसार 81 शिक्षणसेवकांना 31 जुलैपर्यंत दोन वर्षांचा वेतन फरक देण्याचे आदेश दिले आहेत.**



शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांच्या हलगर्जी, गलथान कारभारामुळे महापालिकेला 10 कोटींचा फटका बसला आहे.

महाराष्ट्रात शिक्षक भरतीसाठी प्रथम 3 वर्षांसाठी शिक्षण सेवक म्हणून मानधनावर नियुक्ती केली जाते. महापालिकेने 2024 मध्ये माध्यमिक विभागासाठी 148 शिक्षण सेवक पदासाठी शासनाच्या पवित्र पोर्टलवर जाहिरात प्रसिध्द केली. ही भरती 18 हजार रुपये मानधनावर करण्यात येणार होती. मात्र, पवित्र पोर्टलवर मानधनाचा पर्याय येत नसल्यामुळे एस-14 या वेतन श्रेणीनुसार 81 शिक्षकांची भरती करणे महापालिकेला भाग पडले.

वास्तविक पोर्टलवर मानधनाचा पर्याय येत नसल्याची बाब शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तत्कालीन आयुक्तांनाही सांगितली नाही. तसेच याबाबत राज्य शासनाच्या शिक्षण विभागाशी पत्रव्यवहार केला नाही. 148 जागांपैकी यामधील 101 जण रुजू झाले. त्यापैकी 20 जण मानधनावर घेण्यात आले, तर 81 जण शिक्षणसेवक म्हणून रुजू झाले. या 81 जणांना रुजू करून घेताना मासिक 18 हजार रुपये मानधनावर घेतल्याचे पत्र शिक्षण विभागाने घेतले. मात्र, त्यानंतर या सर्व शिक्षणसेवकांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली.

महाराष्ट्र सरकारच्या सातव्या वेतन आयोगानुसार एस - 14 ही वेतन श्रेणी आहे. यामध्ये शिक्षकाला कमीत कमी वेतन 60 हजार तर जास्तीत जास्त सव्वालाख वेतन मिळते.

### सर्वोच्च न्यायालयाचा इशारा

महापालिकेने प्रसिध्द केलेल्या जाहिरातीनुसार त्यांना मानधन नव्हे, तर एस-14 वेतन श्रेणीनुसार वेतन द्यावे, असे स्पष्ट आदेश देत महापालिकेच्या शिक्षण विभागाला फटकारले. उच्च न्यायालयात आपल्या विरोधात निकाल लागल्यामुळे महापालिकेने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचा निकाल कायम ठेवला. तसेच आठ आठवड्यांत म्हणजे 31 जुलैपर्यंत वेतनाचा फरक देण्याचे आदेश दिले. आठ आठवड्यांत फरक न दिल्यास 5 टक्के दंड आकारण्यात येईल, असा इशाराही सर्वोच्च न्यायालयाने महापालिकेला दिला आहे.

“ शिक्षणसेवकांना तीन वर्षे 18 हजार मानधन दिले जाणार होते. त्यानंतर वेतनश्रेणी दिली जाणार होती. मात्र, पवित्र पोर्टवर मानधनाचा पर्याय नव्हता. त्यामुळे गैरसोय झाली आता शिक्षण सेवकांना दोन वर्षाच्या वेतनाचा फरक दिला जाणार आहे. यामुळे राज्यभरातील हजारो शिक्षणसेवकांना आर्थिक दिलासा मिळणार असून, प्रलंबित वेतनफरक लवकरच अदा करण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे. या निर्णयामुळे मानधनासंदर्भातील तांत्रिक अडचण दूर होऊन शिक्षणसेवकांवरील आर्थिक अन्यायही कमी होणार आहे.

- संगीता बांगर ( प्रशासन अधिकारी, शिक्षण विभाग, पिं.चिं.मनपा)

---

# पिंपरी-चिंचवडमध्ये उकाड्याचा कहर; नागरिक हैराण, आरोग्यावर परिणाम

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिक दिवसेंदिवस वाढणाऱ्या उकाड्याने हैराण झाले आहेत. जून महिना उजाडल्यामुळे आतातरी उन्हाची तीव्रता कमी होईल, अशी आशा असताना उन्हाच्या चटक्याने नागरिकांना नकोसे झाले आहे. मधूनच ढगाळ वातावरणामुळे आणि उष्ण हवेमुळे दिवस-रात्र घामाघूम अशी अवस्था होत आहे. यंदा पाऊस लांबल्यामुळे जून महिन्यातदेखील उकाडा असणार असे हवामान विभागाने सांगितले आहे.**




त्यामुळे नागरिकांना कधी पाऊस पडेल अशी आशा लागून राहिली आहे. दररोज तापमान 35 ते 36 अंशाच्या दरम्यान असूनही 40 अंशा इतका उकाड्याचा अनुभव नागरिकांना येत आहे. रात्रीचे तापमानदेखील जास्त असल्याने रात्रीही घामाच्या धारा अशी परिस्थिती असल्याने नागरिकांना डिहायड्रेशन आणि त्वचेसंबधी विकारांचा सामना करावा लागत आहे.

वाढत्या उकाड्यामुळे घरात आणि कार्यालयातही वातानुकुलित यंत्रणेचा वेग वाढलेलाच आहे. कामाच्या ठिकाणी दिवसभर एसीमधून बाहेर आल्यानंतर बाहेरच्या तापमानाचा विपरित परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होऊ लागला आहे. त्यामुळे उलटी, मळमळ, चक्कर येणे अशा विकारात वाढ झाली आहे.

उन्हामध्ये कामानिमित्त बाहेर पडणाऱ्यांचे आणि उन्हामध्ये काम करणाऱ्या कामगारांचे प्रचंड हाल होताना दिसत आहे. उन्हात जाताना नागरिकांना टोपी, गॉगल, सनप्रूफ जॅकेट, मास्क, हातमोजे, स्कार्फ, छत्री अशी सुरक्षा साधने घेऊनच बाहेर पडत आहेत. उन्हामुळे शहरातील मुख्य चौक, बाजारपेठा, भाजी मंडई अशी गजबजलेली ठिकाणे ओस दिसू लागली आहेत.

### कुलर, एसीच्या वापरात वाढ

सध्याच्या उकाड्यामुळे फॅनमुळे मिळणारी हवा दमट असल्याने नागरिकांचा आता कुलर आणि एसी घेण्याकडे कल आहे. बाजारात इलेक्ट्रिक दुकानांमध्ये कुलर आणि एसींना मागणी वाढली आहे. सर्वसामान्यांना परवडणारे कुलर बाजारात उपलब्ध आहेत, तर श्रीमंत लोकांचा कल एसी घेण्याकडे आहे. उन्हामुळे दिवसरात्र फॅन, एसी, कुलर यामुळे नागरिकांच्या वीजबिलातही मोठी वाढ झाली आहे. मात्र, भयंकर उकाडा असल्याने वातानुकुलित यंत्रणा सुरू ठेवल्याशिवाय पर्याय नाही. वीजबिल कमी करण्यासाठी नागरिक सायंकाळी बागा, उद्यानांमध्ये वेळ घालविताना दिसत आहेत.

### उकाड्याच्या तीव्रतेमुळे नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत

उकाड्याची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असल्याने नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत होत आहे. दुपारच्या वेळेत अत्यावश्यक कामाशिवाय बाहेर पडणे अनेकजण टाळत आहेत. रस्त्यांवरील वर्दळही नेहमीच्या तुलनेत लक्षणीय घटल्याचे चित्र दिसत आहे. थंड पेये, ताक, लिंबूपाणी आणि नारळपाण्याची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि दीर्घकालीन आजार असलेल्या व्यक्तींना विशेष काळजी घेण्याचा सल्ला डॉक्टरांकडून दिला जात आहे. शरीरातील पाण्याची कमतरता टाळण्यासाठी पुरेसे पाणी पिण्याचे आवाहन आरोग्य तज्ज्ञ करत आहेत. सकाळी आणि सायंकाळीही उष्णतेची तीव्रता कायम असल्याने नागरिकांना दिलासा मिळत नाही. वातावरणातील वाढलेल्या आर्द्रतेमुळे उकाड्याची झळ अधिक तीव्रतेने जाणवत आहे.

PRIYADARSHANI
GROUP OF SCHOOLS


# BLOOD DONATION CAMP

## IN THE LOVING MEMORY OF
## LATE SMT. NAVAL INDRAMAN SINGH JI

## BE A HERO TODAY !

Join Our Blood Donation Drive


June 13, 2026
10:00 AM – 3:00 PM



Priyadarshani School Moshi.
Gat No: 195, Dehu Alandi
Road Boratewadi Moshi

### WHY YOU SHOULD DONATE BLOOD

One donation can save three lives. Stay healthy, spread kindness. Your blood makes a difference.




9890613333
pgosm05@gmail.com